# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय, लातूर

| | | |
|---|---|---|
| Office : 02382-250634<br>Fax :- 02382-251866<br>E-mail:- celatur@mahadiscom.in | महावितरण | Office of the Exe. Engr. CGRF<br>Latur Zone, Vidyut Bhavan, Ground floor, Old power house, Sale galli, Latur – 413512 |
| EE/CGRF/LTR/67 | | Date :- 11.06.2019 |

**ग्राहक तक्रार क्र.** : ०४/२०१९
**तक्रार दाखल दिनांक** : १२.०२.२०१९

**प्रति,**

**१. मे. इंडस टॉवर्स लि.**
२०१०, ई-कोर, दुसरा मजला,
मार्वल एज, विमान नगर, पूणे - ४११०१४.

**२. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
अति-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं.मर्या. उपविभाग, परळी (वै)

**विषय :-** तक्रार अर्ज क्र. ०४/२०१९ प्रकरणी निकाल

वरील विषयास अनुसरुन मे. इंडस टॉवर्स लि, यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे सुनावणी घेवून तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. सदरील प्रकरणी निकालाची छायांकीत प्रत सोबत आपल्या माहितीस्तव जोडलेली आहे.

**कार्यकारी अभियंता**
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत
ग्राहक तक्रार निवारण मंच, लातूर

**सोबत :** वरीलप्रमाणे

**प्रतिलिपी सविनय सादर :-**
१) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, परिमंडल कार्यालय, लातूर

**प्रतिलिपी :-**
१) अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, बीड
२) कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, मंडळ कार्यालय, बीड
३) कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित विभागीय कार्यालय, अंबाजोगाई

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय लातूर

**ग्राहक तक्रार क्रमांक** : ०४/२०१९ ( दिनांक : १२.०२.२०१९ )

**मे. इंडस टॉवर्स लि.**
**२०१०, ई-कोर, दुसरा मजला,**
**मार्वल एज, विमान नगर, पूणे - ४११०१४.**

**--ग्राहक अर्जदार**

**-- विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**अति-कार्यकारी अभियंता, म. रा. वि. वि. कं.मर्या. उपविभाग, परळी (वै)** **-- गैरअर्जदार**

| | | | |
|---|---|---|---|
| **कोरम :** | **श्री. पंडितराव बी. मोरे** | **:** | **अध्यक्ष** |
| | **श्री. सुधीर भाऊराव देशमुख** | **:** | **सदस्य** |
| | **श्री. एम. एस. मिसाळ** | **:** | **सचिव** |

## निकाल
**दि. ११.०६.२०१९**

ग्राहक अर्जदार, "मे. इंडस टॉवर्स लि. " २०१०, ई-कोर, दुसरा मजला, मार्वल एज, विमान नगर, पूणे. (ग्राहक क्र. ५८९०६०३९००४९) यांनी त्यांची तक्रार 'अ' फॉर्ममध्ये श्री. विनय किनाळकर यांच्या हस्ते दि. १२.०२.२०१९ रोजी मंचामध्ये दाखल केली आहे. त्यांचे गाऱ्हाणे खालीलप्रमाणे आहे.

२) दि. ११.११.२०१७ रोजी त्यांनी ऑनलाईन तक्रार केली की, मिटर बदलुन देण्यात यावे. परंतु डिसेंबर २०१७ च्या विज बिलामध्ये मध्ये त्यांना कुठलीही पुर्व कल्पना न देता जुने मिटर काढून नवीन मिटर देण्यात आले. तसेच जानेवारी २०१८ च्या वीज बिलामध्ये १३३१९५ Assesment युनिटचे बील देण्यात आले. त्यांना मागील बरेच महिण्यापासून सरासरी मध्येच बिल देण्यात आलेले आहे. प्रत्यक्षात मिटर रिडिंग प्रमाणे बिले द्यायला हवे होते. हे बिल आल्यानंतर त्यांनी वेळोवेळी प्रभारी उप कार्यकारी अभियंता व सहा-अभियंता यांना या रिडिंग बद्दल विचारणा केली व तसेच मिटर काढून नेताना त्यांच्या प्रतिनिधी समोर स्पॉट इन्स्पेक्शन रिपोर्ट न बनवता मिटर घेवुन गेले. त्यानंतर कमीत कमी सहा ते सात महिने त्यांना वारंवार लेखी सहीत विचारणा करुन सुध्दा त्यांना पुर्ण माहिती देण्यात आली नाही. प्रत्यक्ष समोर आल्यानंतर गैर अर्जदार उपकार्यकारी अभियंता त्यांना मिटर टेस्टींग रिपोर्ट आणि बाकी माहिती देऊन बिलाची विचारणा केली परंतु, या संदर्भा मध्ये त्यांनी IGRC, बीड येथे तक्रार दाखल केली. त्यांनी IGRC Beed यांना कुणालाही कल्पना न देता सुनावणी देऊन टाकले या पुर्ण बाबीमुळे त्यांना या तक्रारी मध्ये मीटर टेस्टींग व एम.आर.आय. सादर करण्यात यावा तसेच मागील सरासरी बीलामध्ये त्याची बेनीफिट देण्यात यावे. त्याकाळामध्ये त्यांचा टॉवर वरील लोड कमी होता तरी सध्याचे उप कार्यकारी अभियंता त्यांनी मागच्या

एक-दोन महिन्यातील रिंडींगचा आधार घेऊन रिंडिंग बरोबर आहे असे सांगितले आहे. याची शहानिशा करण्यात यावी. तसेच मागील दोन वर्षामध्ये टॅरीफ चेंज च्या कारणास्तव जे बदल घडले त्यानुसार त्यांना ते दुरुस्ती करण्यात यावी.

३) गैर अर्जदार महावितरण तर्फे श्री. नितिन निवृत्ती थिटे, अति-कार्यकारी अभियंता, उपविभाग, परळी वै. यांनी कथन केले की, सदर ग्राहकाचे मिटर त्यांच्या विनंती वरुन मिटरचे कॉनटॅक्ट खराब झाल्यामुळे बदलण्यात आला होता. (Online request ID 7558267) मीटर बदली अहवालावरुन मीटर दि. २०.११.२०१७ रोजी बदलण्यात आले होते. मीटर बदलण्याचे कारण ग्राहकाची तक्रार व मीटर बदली अहवालावरुन एकच आहे व ते मीटर कॉनटॅक्ट खराब असल्यामुळे मीटरवर शेवटची रिडिंग १७२७५५ इतके होती. परंतु त्यापुर्वी कमी युनीटचे बिलींग झाल्यामुळे १३२३८५ फरक युनीटचे बील जानेवारी २०१८ मध्ये आकारण्यात आली होती. बील जास्त आल्यामुळे ग्राहकाने मीटर तपासण्याची मागणी केली होती. त्यानुसार मीटर तपासणी युनीट अंबाजोगाई येथे टेस्ट करण्यात आले. त्याचा अहवाल पत्र क्र. १८६ दि. २२.०३.२०१८ नुसार करविण्यात आला व त्यानुसार मीटर मध्ये कसलाही दोष नसल्याचे प्रमाणीत करण्यात आले आहे. सबब मीटरवर रेकार्ड केलेले युनीट हे ग्राहकाने त्यांच्या उपयोगासाठी वापरले असून त्यापोटी त्यांना आकारण्यात आलेले बिल योग्य आहे. सदर बदलेले मीटर जानेवारी २०१५ मध्ये बसविण्यात आले होते. जानेवारी २०१५ ते मीटर बदलेल्या कालावधी पर्यंत सरासरी ५००० युनीट प्रति महा या प्रमाणे ग्राहकाचा वापर होता. सध्याचा मीटरचा वापर ६००० युनीट पर मध्ये आहे. यावरुन जुन्या मिटरचे वापर योग्य असल्याचे स्पष्ट होते. केवळ मिटर रिंडींग च्या अनियमीतमुळे त्यांच्या मिटरवर संचयीत रिंडींग होती. आज रोजी ग्राहकाकडे रु. २२,२४,२८०/- इतकी थकबाकी असुन ती योग्य असल्याने ती ग्राहकाने भरणे बाबत आदेशित करावे. अशी विनंती मंचाकडे केली.

४) मंचाने दि. ११.०४.२०१९ रोजी उभयपक्षाची सुनावणी घेतली व दोन्ही बाजु ऐकुन सदर विवादीत मीटर कार्यकारी अभियंता, लातूर यांचेकडे मिटर तपासणी प्रयोगशाळेत मीटर तपासण्याचे आदेश दिले. त्याचा तपासणी अहवाल दि. २९.०४.२०१९ अन्वये प्राप्त झाला. सदर अहवालानुसार सदर मीटर निर्दोष असल्याचे उघड झाले. त्यानंतर दि. २२.०५.२०१९ रोजी मंचाने पुनहः सुनावणी घेतली, सदर तक्रारदार/ग्राहक अर्जदार वैयक्तीक कारणाने गैरहजर होते. गैर अर्जदार महावितरण तर्फे श्री. राहुल रामलिंग भुजबळ, उच्चस्तर लिपिक, परळी उपविभाग, परळी यांनी त्यांची बाजु अशी मांडली की, सदरील ग्राहकाचा मिटर 3 PH, 10x40 A, L&G Serial No. 500040529 सदरील मिटर हे लातूर टेस्टींग येथे दि. २९.०४.२०१९ रोजी पाठविले असता सदरील मिटर निर्दोष आढळले आहे, सबब मिटर वरील फायनल रिडींग ही अचुक आहे.

५) मिटर रिडींग एजन्सिजने वेळोवेळी मिटर रिडींग हे विहित वेळेत घेतली नसल्याकारणाने सबब मिटर संचीत आढळले आहे. त्या कारणास्तव सदरील एजन्सिजला जा.क्र./अ.का.अ/परळी/लेखा/१०४३ दि. २४.०८.२०१८ नुसार काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव विभागीय कार्यालय, अंबाजोगाई येथे प्रस्तावित केलेला आहे. सदर बिले हे योग्य असुन ग्राहक मंचास विनंती केली की, ग्राहका कडुन सदर बिल वसुल करण्याचे आदेशित केले.

## निष्कर्ष

६) अर्जदार ग्राहक यांना गैर अर्जदार यांनी जानेवारी २०१८ च्या वीज बिलामध्ये १३३१९५ Assesment युनिटचे बील देण्यात आले. सदर वीज बिल रद्द करण्या विषयी मंचाकडे विनंती केली. उभय पक्षांचे युक्तीवाद ऐकले व त्यानुसार ग्राहकाचे मिटर निर्दोष असल्याचे दिसुन येते. सबब मिटर वरील फायनल रिडींग ही अचुक आहे. परंतु मिटर रिडींग एजन्सिजने वेळोवेळी मिटर रिडींग हे विहित वेळेत घेतली नसल्याकारणाने सबब मिटर वरील युनिट संचीत आढळले आहे. सदर बदलेले मीटर जानेवारी २०१५ मध्ये बसविण्यात आले होते. व जानेवारी २०१५ पासून मीटर रिडिंग योग्य प्रकारे घेतले नसल्यामुळे वरील संचीत १३३१९५ युनिटचे बील हे जानेवारी २०१५ ते डिसेंबर २०१७ या कालावधीतील आहे. सदर Assesment युनिट हे २ वर्षे ११ महिने इतक्या कालावधीचे संचित युनिट आहेत.

७) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे कडील WP No. १७६४ of २०११ आदेश दि. १२.०३.२०१९ नुसार (page no.99) प्रमाणे ***"The distribution licensee cannot demand charges for consumption of electricity for a period of more than two years preceding the date of the first demand of such charges".*** सबब गैर अर्जदार केवळ प्रथम बील मागणीच्या २४ महिने पूर्वीचा वीज वापराचे Assesment बिल देऊ शकतात. वास्तवीक पहाता सदरची मागणी ग्राहकाने त्याच्या तक्रारीत केली नाही. तरी पण मंचाचे मते ना. उच्च न्यालयाचा आदेशाचे पालन करणे आवश्यक आहे. सबब आदेश.

## आदेश

१) ग्राहक अर्जदाराची 'अ' फॉर्म मधील तक्रार मान्य करण्यात येत आहे.
२) ग्राहकास जानेवारी २०१८ मध्ये दिलेले १३३१९५ युनिट चे Assesment बील रद्द करण्यात यावे.
३) ग्राहकास डिसेंबर २०१६ ते नोव्हेंबर २०१८ एकूण २४ महिन्यातील संचित युनिटचे सुधारीत बिल ग्राहकास देण्यात यावे.
४) सदर Assesment बील ग्राहकास समान मासिक ६ हफ्त्यामध्ये भरण्याची सवलत देण्यात आली आहे.
५) ग्राहकाने आदेशाप्रमाणे हफ्ते भरण्यास कसुर केल्यास पहिला हफ्ता थकीत झाल्या पासून थकीत रकमेवर MERC प्रमाणे DPC + व्याज आकारण्यात यावे.

ग्राहक अर्जदारास मंचाचा निर्णय मान्य नसेल तर ग्राहक अर्जदार मंचाच्या निकालापासून ६० दिवसाच्या आत ब फॉर्म मध्ये आपले आवेदन खालील पत्त्यावर मा. विद्युत लोकपाल यांचे कडे सादर करु शकतात. फॉर्म ब या कार्यालयात कार्यालयीन वेळेत विनामूल्य मिळेल. मा. विद्युत लोकपाल यांचा पत्ता खालील प्रमाणे आहे.

मा.विद्युत लोकपाल
महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग,
प्लॉट नं.१२ श्रीकष्ण विजय नगर छावणी,
नागपूर-४४००१३.
दुरध्वनी क्र.०७१२-२०२२१९८
ठिकाण : - लातूर
दिनांक :- ११.०६.२०१९

11.6.19 — अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर

11-6-19 — सदस्य, ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर

11/06/19 — कार्यकारी अभियंता/सचिव, ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर